RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष २, अंक ११२(१०)] शुक्रवार, डिसेंबर २३, २०१६/पौष २, शके १९३८ [पृष्ठे १४, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक १७८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृहनिर्माण विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ डिसेंबर २०१६.

### अधिसूचना

**स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६.**

क्रमांक रीईप्रा. २०१६/प्र. क्र. ७९/दुवपु-२.—स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६ याच्या कलम ८४ ची पोट-कलमे (१) व (२) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासनाने करण्याचे योजिलेल्या नियमांचा पुढील मसुदा, त्यामुळे बाधा पोहोचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे ; आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येत आहे की, उक्त नियमांचा मसुदा दिनांक २३ डिसेंबर २०१६ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उपरोक्त दिनांकास किंवा त्यापूर्वी उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तींकडून ज्या कोणत्याही हरकती व सूचना, ई-मेल द्वारे *"suggesstionsonrera@maharashtra.gov.in"* वर किंवा टपालाद्वारे प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे प्राप्त होतील, त्या शासन विचारात घेईल.

## नियमांचा मसुदा

स्थावर संपदा ( विनियमन व विकास ) अधिनियम, २०१६ याच्या कलम ८४ च्या पोट- कलम (१) आणि पोट- कलम (२) चे खंड (छ), (झ), (ञ), (ट), (द), (ध), (प), (य ख), (य ग) आणि (य च) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण, भाग चार-अ, दिनांक ***२०१६, यात प्रसिध्द करण्यात आलेल्या शासकीय अधिसूचना, गृहनिर्माण विभाग, क्र. *** दि.*** २०१६, अनुसार प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन याद्वारे, पुढील नियम करीत आहे. :-

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ :-** (१) या नियमांस, महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन व विकास) (व्याज शास्ती, नुकसानभरपाई, देय दंड यांची वसुली; तक्रारी व अपील इत्यादींचे नमुने) नियम, २०१६ असे म्हणावे.

२. **व्याख्या** :- या नियमांमध्ये अन्यथा आवश्यक नसेल तर,

(क) "अधिनियम" याचा अर्थ, स्थावर संपदा (विनियमन व विकास) अधिनियम, २०१६, असा आहे;

(ख) "अपील न्यायाधिकरण" याचा अर्थ, राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी, अधिनियमाच्या कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण, असा आहे आणि त्यात निरनिराळ्या क्षेत्रांसाठी स्थापन करण्यात येतील अशा निरनिराळ्या अपील न्यायाधिकरणांचा समावेश होतो;

(ग) "प्राधिकरण" याचा अर्थ, राज्य शासनाने, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा क्षेत्रासाठी किंवा क्षेत्रांसाठी अधिनियमाच्या कलम २० च्या पोट- कलम (१)

अन्वये स्थापन केलेले स्थावर संपदा नियामक प्राधिकरण, असा आहे आणि त्यात निरनिराळ्या क्षेत्रांसाठी स्थापन करण्यात येतील अशा निरनिराळ्या प्राधिकरणांचा समावेश होतो;

(घ) "अध्यक्ष" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम २१ अन्वये नियुक्त केलेला प्राधिकरणाचा अध्यक्ष, असा आहे;

(ङ) "नमुना" याचा अर्थ, या नियमांना जोडलेले नमुने, असा आहे;

(च) "सदस्य" याचा अर्थ, या अधिनियमाच्या कलम २१ अन्वये नियुक्त केलेला प्राधिकरणाचा पूर्ण वेळ सदस्य, असा आहे;

(छ) "राज्य शासन" किंवा " शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(२) यामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या अधिनियमामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ नेमून देण्यात आले असतील तेच अर्थ असतील.

३. **व्याज, शास्ती व नुकसानभरपाई यांच्या वसुलीची रीत:-** अधिनियमाच्या कलम ४० अन्वये प्रवर्तक किंवा वाटपग्राही किंवा स्थावर संपदा एजंट यांच्यावर लादण्यात आलेले कोणतेही व्याज किंवा शास्ती किंवा नुकसानभरपाई, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६, (महा. १९६६ चा अधि. ५१) मध्ये तरतूद केल्यानुसार जमीन महसुलीची थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल.

४. **अभिनिर्णय अधिकारी, प्राधिकरण किंवा अपील न्यायाधिकरण यांचे आदेश, निदेश किंवा निर्णय यांची अंमलबजावणी करण्याची रीत-** कलम ४० च्या पोट कलम (२) च्या प्रयोजनार्थ, अभिनिर्णय अधिकारी, प्राधिकरण किंवा, यथास्थिति, अपील न्याधिकरण यांनी अधिनियमान्वये किंवा त्याखाली तयार करण्यात आलेल्या नियमान्वये किंवा विनियमान्वये संमत केलेला प्रत्येक आदेश, हा जणुकाही मुख्य दिवाणी न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या दाव्याबाबत,जणुकाही त्या न्यायालयाने दिलेला तो हुकुमनामा किंवा आदेश होता त्याच रीतीने अभिनिर्णय अधिकारी, प्राधिकरण किंवा अपील न्यायाधीकरण यांच्याकडून अंमलात आणण्यात येतील आणि अभिनिर्णय अधिकारी,

प्राधिकरण किंवा, यथास्थिति, अपील न्यायाधिकरण यांच्यासाठी असे आदेश निष्पादित करण्यासाठी असमर्थ ठरत असतील तर, अशा प्रसंगी, असा आदेश, एकतर ज्या स्थानिक सीमा अधिकार क्षेत्रात स्थावर संपदा प्रकल्प स्थित आहे अशा मुख्य दिवाणी न्यायालयात किंवा ज्याच्या विरोधात आदेश काढण्यात आला आहे ती व्यक्ती ज्या स्थानिक सीमांमध्ये राहात असेल अथवा व्यवसाय करीत असेल अथवा लाभासाठी प्रत्यक्ष काम करीत असेल अशा स्थानिक सीमा अधिकार क्षेत्रातील मुख्य दिवाणी न्यायालयात निष्पादित करण्यासाठी पाठविणे कायदेशीर असेल.

५. **अपराध आपसात मिटविण्यासाठीच्या अटी व शर्ती आणि देय असलेला दंड :-** (१) न्यायालय, कलम ७० अंतर्गत कोणताही अपराध आपसात मिटविण्याच्या प्रयोजनांसाठी, खाली दिलेल्या तक्त्यात विनिर्दिष्ट केलेली रक्कम स्वीकारू शकेल :-

<u>तक्ता</u>

| अपराध | अपराध आपसात मिटविण्यासाठी प्रदान करावयाची रक्कम. |
|---|---|
| कलम ५९ च्या पोटकलम (२) खालील अपराध | स्थावर संपदा प्रकल्पाच्या अंदाजित दराच्या / रकमेच्या २ टक्के परंतु ती १० टक्यांपर्यत वाढविता येईल. |
| कलम ६४ खालील अपराध | स्थावर संपदा प्रकल्पाच्या अंदाजित दराच्या / रक्कमेच्या ५ टक्के परंतु ती १० टक्क्यांपर्यत वाढविता येईल. |
| कलम ६६ खालील अपराध | स्थावर संपदा प्रकल्पातील असा भुखंड, वेश्म किंवा, यथास्थिति, इमारत, ज्याची विक्री किंवा खरेदी करणे सुलभ केले आहे, यांच्या अंदाजित दराच्या ५ टक्के परंतु ती १० टक्क्यांपर्यंत वाढविता येईल. |
| कलम ६८ खालील अपराध | भूखंड, वेश्म किंवा, यथास्थिति, इमारत यांच्या अंदाजित दराच्या ५ टक्के परंतु ती १० टक्क्यांपर्यंत वाढविता येईल. |

(२) शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याला, प्राधिकरणाच्या मान्यतेने, अशा अपराधाचा आरोप असलेल्या कोणत्याही व्यक्तीकडून, अपराधाची भरपाई म्हणून उपनियम (१) च्या तक्त्यात विनिर्दिष्ट केलेली रक्कम स्वीकारता येईल.

(३) वरील तक्त्यानुसार रकमेचे प्रदान केल्यावर, त्याच अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तीविरुध्द आणखी कार्यवाही केली जाणार नाही, व या अगोदर केलेली किंवा सुरु केलेली कार्यवाही समाप्त होईल, आणि आरोपी व्यक्तीला, जर ती ताब्यात असेल तर, सोडून देण्यात येईल.

(४) प्रवर्तक, वाटपग्राही किंवा, यथास्थिति, स्थावर संपदा एजंट, न्यायालयाने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत, जो कालावधी अपराध आपसात मिटविल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांपेक्षा अधिक नसेल, प्राधिकरणाच्या किंवा अपील न्यायाधिकरणाच्या आदेशांचे पालन करील.

**६. कलम ७१ अन्वये, अभिनिर्णय अधिकाऱ्याकडे तक्रार दाखल करण्याची रीत-** (१) व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, कलम १२,१४,१८ व १९ खालील नुकसानभरपाईसाठी, अभिनिर्णय अधिकाऱ्याकडे या नियमांना जोडलेल्या नमुना-अ, मध्ये तक्रार दाखल करता येईल व त्यासोबत एक हजार रुपये इतके शुल्क भरण्यात येईल.

(२) हे शुल्क, ऑनलाईन अर्ज दाखल करण्याच्या वेळी एनईएफटी किंवा आरटीजीएस प्रणालीमार्फत किंवा कोणत्याही अनुसुचित बँकेच्या प्रदानादेशामार्फत किंवा दर्शनी धनाकर्षामार्फत प्रदान करता येईल.

**७. अभिनिर्णय अधिकाऱ्याने अनुसरावयाची कार्यपध्दती :-** (१) अभिनिर्णय अधिकारी, नुकसानभरपाईचा अभिनिर्णय करण्याच्या प्रयोजनार्थ, चौकशीकरिता खालील कार्यपध्दती अनुसरील.

(२) तक्रार प्राप्त झाल्यावर अभिनिर्णय अधिकारी, कथित उल्लंघनाच्या व संबध्द दस्तऐवजाच्या तपशिलासह प्रवर्तकास आणि अर्जदारास किंवा त्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधीस नोटीस काढील. नोटीशीमध्ये सुनावणीचा दिनांक, वेळ व ठिकाण विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(३) अशा रीतीने निश्चित केलल्या दिनांकास, अभिनिर्णय अधिकाऱ्यांच्या मते जो साक्षीपुरावा किंवा कोणतेही कागदपत्र चौकशीच्या दृष्टीने उपयुक्त किंवा संबध्द असेल तर असा साक्षी पुरावा देण्यास किंवा कागदपत्र सादर करण्यास अर्जदारास व प्रवर्तकास, फर्मावील. त्यानंतर, अभिनिर्णय अधिकारी, अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा त्याखाली केलेले नियम व विनियम यांच्याशी संबंधित कथित उल्लंघन केले असल्याविषयी प्रवर्तकास स्पष्टीकरण करील.

(४) अभिनिर्णय अधिकारी युक्तिवाद नोंदवील आणि अधिनियमाच्या तरतुदी किंवा त्याखाली केलेले नियम व विनियम यांनुसार त्याला योग्य वाटेल अशी नुकसानभरपाई प्रदान करण्याचे निदेश देईल.

(५) अभिनिर्णय अधिकारी, उपनियम (४) अन्वये कोणताही आदेश मंजूर करण्यापूर्वी, अधिनियमाच्या कलम ७२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले घटक विचारात घेईल.

(६) जर कोणतीही व्यक्ती, फर्माविल्याप्रमाणे अभिनिर्णय अधिकाऱ्यासमोर हजर राहण्यात किंवा उपस्थित राहण्यात कसूर करील, हलगर्जीपणा करील किंवा हजर राहण्यास किंवा उपस्थित राहण्यास नकार देईल तर, अभिनिर्णय अधिकाऱ्यास, अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती अनुपस्थित राहिल्याची कारणे नोंदवल्यानंतर त्याच्या किंवा त्यांच्या अनुपस्थितीत, चौकशीबाबत पुढील कार्यवाही करण्याचा अधिकार असेल.

(७) अभिनिर्णय अधिकाऱ्यासमोर सादर केलेला साक्षीपुरावा आणि इतर नोंदी व सादर निवेदने विचारात घेतल्यावर जर अभिनिर्णय अधिकाऱ्याची खात्री पटली की, एखादी व्यक्ती अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी किंवा नियम, विनियम, निदेश किंवा आदेश या अन्वये नुकसानभरपाई

मिळण्यास किंवा व्याज देण्यास पात्र ठरलेली आहे तर अभिनिर्णय अधिकारी, लेखी आदेशाने, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे नुकसानभरपाई प्रदान करण्याचा आदेश देईल.

८. **नोटीस आणि आदेश बजावावयाची रीत :-**(१) अभिनिर्णय अधिकारी आदेशाची एक प्रमाणित प्रत, तक्रारदारास व उत्तरवादीस पाठवील.

(२) या नियमांन्वये काढण्यात आलेली नोटीस किंवा आदेश, एखाद्या व्यक्तीस पुढीलपैकी कोणत्याही रीतीने बजावण्यात येईल :-

(क) त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या प्राधिकृत एजंटला इलेक्ट्रॉनिक माध्यमाव्दारे देऊन किंवा तिच्या स्वाधीन करून बजावणे:

परंतु, संबंधित व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक अभिलेख प्रत्येक्षात दिलेला आहे याचा वाजवी पुरावा असला पाहिजे; किंवा

(ख) त्या व्यक्तीच्या निवासाच्या पत्त्यावर, ती शेवटी आढळून आल्याच्या किंवा तिचे निवासस्थान होते अशा शेवटच्या ज्ञात पत्त्यावर किंवा कामकाजाच्या ठिकाणच्या पत्त्यावर, पोच देय नोंदणीकृत टपालाने त्या व्यक्तीला पाठवणे; किंवा

(ग) वरील खंड (क) किंवा (ख) अन्वये ते बजावणे शक्य नसल्यास, ती व्यक्ती ज्या ठिकाणी राहात असेल किंवा शेवटी ज्या ठिकाणी राहात असल्याचे माहिती असेल किंवा कामकाजाच्या किंवा प्रत्यक्षपणे काम करत असणा-या किंवा लाभासाठी शेवटी जिथे काम करत असेल अशा इमारतीच्या बाहेरच्या दरवाजावर किंवा त्या इमारतीच्या एखाद्या ठळक भागावर दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत नोटीस चिटकवणे.

९. **अपील न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करण्यासाठीचा नमूना व देय असलेले शुल्क :-**(१) जेथे उक्त अपील न्यायाधिकरण स्थित आहे अशा न्यायाधिकरणाकडे कलम ४४ च्या पोटकलम (१) अन्वये दाखल केलेल्या प्रत्येक अपिलासोबत,एनइएफटी किंवा आरटीजीएस यंत्रणेमार्फत किंवा

अपील न्यायाधिकरणाच्या नावे कोणत्याही अधिसूचित बॅकेचा प्रदानदेशामार्फत किंवा दर्शनी धनाकर्षामार्फत रुपये पाच हजार रकमेचे शुल्क जोडण्यात येईल.

(२) प्रत्येक अपील हे, या नियमासोबत जोडलेल्या नमुना "ब" मध्ये, त्यासोबत पुढील कागदपत्रे जोडून दाखल करण्यात येईल :-

(क) ज्या आदेशाविरुध्द अपील दाखल केले आहे त्या आदेशाची साक्षांकित सत्य प्रत ;

(ख) अपीलकर्ता व अपिलामध्ये निर्देशित केलेल्या व्यक्तींनी, ज्याचा आधार घेतलेला आहे त्या कागदपत्रांच्या प्रती ;

(ग) कागदपत्रांची निर्देशसूची.

**नमुना "अ"**

**[नियम ६ (१) पहा]**

**<u>अभिनिर्णय अधिकाऱ्याकडे करावयाचा अर्ज</u>**

(अधिनियमाच्या कलम ३१ तसेच कलम ७१ अन्वये नुकसानभरपाईसाठी दावा)

अभिनिर्णय अधिकारी कार्यालयाच्या वापराकरिता :--------------------

अर्ज दाखल करण्याचा दिनांक:------------------------------------

टपालाद्वारे अर्ज मिळाल्याचा दिनांक :-------------------------------

अर्ज क्रमांक :-----------------------------------------------

स्वाक्षरी :--------------------------------------------------

प्राधिकृत अधिकारी :------------------------------------------

अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयाचे ठिकाण (जागेचे नाव) :---------

श्री/सर्वश्री :-------------------------------------------(अर्जदार) आणि

श्री / सर्वश्री :--------------------------------------------(प्रतिवादी)

दाव्याचा तपशील :

१. अर्जदाराचा / अर्जदारांचा तपशील:

**(एक)** अर्जदाराचे नाव :

(दोन) विद्यमान कार्यालयाचा / अपीलकर्त्याच्या निवासस्थानाचा पत्ता :

(तीन) सर्व नोटिसा बजावण्याचा पत्ता :

(चार) वाटपग्राहीच्या वेश्माचा, भूखंडाचा किंवा इमारतीचा तपशील

२. प्रतिवादींचा तपशील :

**(एक)** प्रतिवादीचे (प्रतिवादींचे) नाव:

(दोन) प्रतिवादीचा कार्यालयीन पत्ता:

(तीन) सर्व नोटीसा बजावण्याचा पत्ता:

(चार) प्रकल्प नोंदणी क्र. व पत्ता :

३. अभिनिर्णय अधिकाऱ्याचे अधिकारक्षेत्र :

अर्जदार असे प्रतिज्ञापन करतो की, दाव्याची विषयवस्तू ही अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या अधिकारक्षेत्रात येते.

४. प्रकरणाची तथ्ये :

(वस्तुस्थितीचे संक्षिप्त निवेदन व प्रवर्तकाविरुध्दच्या दाव्याची कारणे द्यावीत)

५. मागितलेली नुकसानभरपाई :

वरील परिच्छेद ४ मध्ये नमूद केलेली तथ्ये विचारात घेता, अर्जदार पुढील नुकसानभरपाईसाठी विनंती करीत आहे (मागितलेल्या नुकसान भरपाईची कारणे आणि आधारभूत कायदेशीर तरतुदी (जर कोणत्याही असल्यास) नमूद कराव्यात).

६. इतर कोणत्याही न्यायालयाकडे दावा प्रलंबित नाही, इत्यादी :

अर्जदार आणखी असेही घोषित करतो की, ज्या बाबीसंबंधात हे अपील करण्यात आले आहे, ती बाब कोणत्याही न्यायालयासमोर किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा इतर कोणत्याही न्यायाधिकरणासमोर / न्यायाधिकरणांसमोर प्रलंबित नाही.

७. नियम ६ च्या पोटनियम (१) नुसार शुल्काबाबतचा तपशील:

(एक) रक्कम :

(दोन) प्रदान केलेल्या शुल्काबाबतचा तपशील :

८. सहपत्रांची सूची:

(अर्जासोबत जोडलेल्या सहपत्रांचा तपशील विनिर्दिष्ट करावा)

## सत्यापन

मी, ................(ठळक अक्षरात संपूर्ण लिहावे)श्री, ............... यांचा मुलगा / मुलगी अर्जदार म्हणून याद्वारे असे सत्यापित करतो की, परिच्छेद (१ ते ८)मध्ये नमूद केलेला मजकूर माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे खरा आहे आणि मी त्यातील कोणतेही महत्वाचे तथ्य /तथ्ये लपविलेली नाहीत.

ठिकाण :

दिनांक :	अर्जदाराची (अर्जदारांची) स्वाक्षरी

**नमुना “ब”**
**(नियम क्रमांक ९ (२) पहा)**
**अपिल न्यायाधिकरणाकडे करावयाचा अपील अर्ज**
**अधिनियमाच्या कलम ४४ अन्वये**

अपील न्यायाधिकरण कार्यालयाच्या वापराकरिता :

अपील अर्ज दाखल करण्याचा दिनांक:---------------------------

टपालाद्वारे अपील अर्ज मिळाल्याचा दिनांक:----------------------

नोंदणी क्रमांक:------------------------------------------------

स्वाक्षरी:------------------------------------------------------

प्रबंधक:--------------------------------------------------------

**महाराष्ट्र स्थावर संपदा अपील न्यायाधिकरण (ठिकाणाचे नाव)**

**अपिलातील अपीलकर्ता श्री / सर्वश्री..........................आणि...............................**

**प्रतिवादी श्री / सर्वश्री..................................**

**अपिलाचा तपशील :**

१.अपीलकर्त्याचा तपशील:

(एक) अपीलकर्त्याचे नाव:

(दोन) अपीलकर्त्याचा विद्यमान कार्यालयाचा / निवासस्थानाचा पत्ता:

(तीन) नोटिसा बजावण्याचा पत्ता:

२. प्रतिवादींचा तपशील:

(एक) प्रतिवादीचे (प्रतिवादींचे):

(दोन) प्रतिवादीच्या कार्यालयाचा पत्ता:

(तीन) सर्व नोटीसा बजावण्याचा पत्ता:

३. अपील न्यायाधिकरणाचे अधिकारक्षेत्र :

अपीलकर्ता असे प्रतिज्ञापन करतो की, अपिलाची विषयवस्तु ही, पुनर्विलोकन न्यायाधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येते.

४. मुदत:

अपीलकर्ता असे प्रतिज्ञापन करतो की, सदर अपील हे, कलम ४४ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत दाखल केले आहे.

किंवा

कलम ४४ च्या पोटकलम (२)नुसार विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर अपील दाखल केले असल्यास त्याबद्दलच्या विलंबाची कारणे नमूद करावीत...............

५. प्रकरणाची तथ्ये:

(अधिनियमाच्या ......................कलमाखाली (कलमांखाली) दिलेल्या तथ्यांचे संक्षिप्त निवेदन आणि नियामक प्राधिकरणाच्या किंवा, यथास्थिति, अभिनिर्णय अधिकाऱ्याच्या विनिर्दिष्ट आदेशाविरुध्दच्या अपिलाची तथ्ये आणि कारणे संक्षिप्तपणे नमूद करावीत).

६. मागितलेला अनुतोष:

वरील परिच्छेद ५ मध्ये नमूद केलेली तथ्ये विचारात घेऊन अपीलकर्ता पुढील अनुतोषासाठी विनंती करीत आहे.

मागितलेला अनुतोष, त्याबद्दलची कारणे आणि त्यासंबंधातील कायदेशीर तरतुदी, कोणत्याही असल्यास, नमूद कराव्यात.

७. अंतरिम आदेश, त्याकरिता विनंती केली असल्यास:

अपिलावर अंतिम निर्णय होईपर्यंत, अपीलकर्ता, पुढील आदेश देण्याची विनंती करीत आहे.

(येथे विनंती केलेल्या अंतरिम आदेशाचे स्वरूप कारणांसह नमूद करावे)

८. याबाबतचे इतर कोणतेही न्यायालय इत्यादींमध्ये प्रकरण प्रलंबित नाही:

अपीलकर्ता आणखी असेही प्रतिज्ञापन करतो की ज्या प्रकरणासंबंधात हे अपील करण्यात आले आहे ते प्रकरण कोणत्याही न्यायालयीन किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणात किंवा इतर कोणत्याही न्यायाधिकरणात प्रलंबित नाही.

९. नियम ९ च्या उपनियम (१) नुसार शुल्काबाबतचा तपशील:

(एक) रक्कम:

(दोन) प्रदान केलेल्या शुल्काबाबतचा तपशील:

१०. सहपत्रांची सूची:

(एक) ज्या आदेशाविरुध्द अपील दाखल केले आहे, त्या आदेशाची एक साक्षांकित प्रत.

(दोन) अपीलकर्त्यांने ज्या कागदपत्रांचा आधार घेतला आहे आणि ज्यांचा अपिलात निर्देश केला आहे, त्या कागदपत्रांच्या प्रती.

(तीन) कागदपत्रांची अनुक्रमणिका.

## सत्यापन

मी, .............(ठळक अक्षरात संपूर्ण नाव लिहावे), श्री.................यांचा मुलगा / मुलगी अपीलकर्ता म्हणून, याद्वारे, असे सत्यापन करतो की, वरील परिच्छेद (१ ते १०) मध्ये नमूद केलेला मजकूर माझ्या माहिती व विश्वासाप्रमाणे खरा आहे आणि मी त्यातील कोणतेही महत्त्वाचे तथ्य / तथ्ये लपविलेली नाहीत.

ठिकाण: अपीलकर्त्याची/ अपीलकर्त्यांची स्वाक्षरी.

दिनांक:

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा.कों. धनावडे,

शासनाचे उपसचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, Editor : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.